ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

ISSN 2250-169X

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education For All Subjects

# VISION RESEARCH REVIEW



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist Nanded

CHIEF EDITOR

DR. BALAJI KAMBLE

Issue : XV, Vol. V
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 3.48
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018 40

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

7

# उच्च शिक्षणाचे खाजगीकरण

**डॉ. अशोक टिप्परसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. लातूर (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Economics

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत भारतीय उच्चशिक्षण प्रणालीची सध्याच्या परदेशी प्रगत शिक्षण व्यवस्थेशी तुलना होण्याची गरज आहे. भारतीय उच्च शिक्षणाचे संकल्प नोंदणीचे प्रमाण १३.२ टक्के आहे. जागतिक उच्च शिक्षण सकल नोंदणीचा दर सरासरी २४ टक्के आहे. प्रगत देशांमध्ये हे प्रमाण ५८ टक्के आहे. तर विकसनशील देशांमध्ये सकल नोंदणी दर १८ टक्के इतके आहे. याचा अर्थ भारताचा उच्च शिक्षणाचा सकल नोंदणी दर तुलनात्मक दृष्ट्या अतिशय कमी आहे. भारतात देखिल शहरी भाग आणि ग्रामीण भाग यांच्यात प्रचंड तफावत आढळते. शहरात उच्च शिक्षणाचा सकल नोंदणी दर २७.२ टक्के तर ग्रामीण भागात तो केवळ ७.८ टक्के इतक्या निम्ण स्तरावर आहे. संयुक्त राष्ट्र संघाने केलेल्या जागतिक सर्वेक्षणात असे दिसून आले की विकसित देशांमधील १०० युवकांमागे उच्च शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाण ६० ते ७० च्या दरम्यान आहे. आशियातील चीन, दक्षिण कोरीया यासारख्या देशांमध्ये ही संख्या ५० च्या आसपास आहे. तर भारतामध्ये दर १०० विद्यार्थ्यांमध्ये केवळ ७ विद्यार्थी उच्च शिक्षण प्राप्त करीत आहेत. भारताचे 'व्हिजन २०२०' हे महासत्ताक राष्ट्र बनण्याचे उध्दीष्ट साध्य करण्यासाठी या संस्थेमध्ये किमान चार पट वाढ करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

जागतिक व्यापार संघटनेच्या हॉंगकॉंग येथिल झालेल्या परिषदेत शिक्षण क्षेत्राला सेवा क्षेत्राचा दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचाच परिणाम म्हणून शिक्षणाचे सार्वत्रीकीकरण करण्याच्या उध्देशाने ठिकठिकाणी स्वायत्त विदयापीठे स्थापन करुन पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ प्राप्त

Issue : XV, Vol. V
VISION RESEARCH REVIEW
IMPACT FACTOR 3.48
ISSN 2250-169X
June 2018 To Nov. 2018

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

होईल असा भ्रम निर्माण केला गेला. हे केवळ अमेरिकन शिक्षण पध्दतीचे अनुकरण आहे. परंतु यामुळे भविष्यात उद्भवणाऱ्या समस्यांचा विचार मानव संसाधन मंत्रालयाने केलेला दिसत नाही. कारण सदर योजना आपल्या देशासाठी कुचकामी ठरु शकतात.

आपल्या देशाचे धेय्य कोणते?, आपली बलस्थाणे कोणती, आपली कमतरता कोणत्या प्रकारची या बाबींचा विचार करुन नियोजन करण्याची आवश्यकता आहे. भारतीय संस्कृती, भारतीय इतिहास यांना अनुसरुन भारतीय सुयोग्य असे प्रारुप विकसित केले गेले पाहिजे.

वर्तमान उच्चशिक्षण प्रक्रियेत धोरणात्मक बदल झाला पाहिजे याबाबत सर्वांचे एकमत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) आणि मानव संसाधक विकास मंत्रालय (HRD) यांनी १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत (२०१२ ते २०१७) भारतीय उच्च शिक्षणाचे धोरण ठरविण्यासाठी १२९ पानांचे एक 'व्हिजन डॉक्युमेंट' तयार केले. व संधी, प्रावीण्य आणि समता या तीन तत्वांच्या आधारे भारताला उच्च शिक्षण सकल नोंदणी दर २५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करण्यात आले. त्यासाठी १६ नवीन केंद्रीय विदयापीठे व ३७४ नवीन मॉडेल महाविद्यालये व २० महिला विद्यापीठे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर 'राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान' रुसा या नावाने एक योजना तयार केली आहे.

या अभियानात सार्वजनिक व खाजगी भागीदारीची तीन प्रारुपे (मॉडेल) तयार करण्यात आली.

१) खाजगी क्षेत्र उच्च शिक्षणासाठी आवश्यक त्या पायाभूत सरंचना आणि भौतिक सुविधा निर्माण करुण त्यासाठी आवश्यक ती भांडवल गुंतवणुक करेल त्यासाठी सरकार योग्य तो मोबदला देणार. याला 'बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर मॉडेल असे नाव देण्यात आले.'

२) खाजगी क्षेत्र उच्च शिक्षणांसाठी आवश्यक पायाभूत आणि भौतिक सुविधा देण्याबरोबरच उच्च शिक्षण देण्याचे कार्य करणार, परंतु त्यावर नियंत्रण आणि पर्यवेक्षण सरकारचे राहिल. याला 'आऊट सोर्सींग मॉडेल' असे नाव दिले.

३) यात सरकार आणि खाजगी क्षेत्र, एकत्रीतपणे पायभूत आणि भौतिक सुविधा निर्माण करतील. त्यासाठी एकत्रीत भांडवल गुंतवणूक करणार. परंतु उच्च शिक्षणाची संपुर्ण जबाबदारी खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात येईल. याला 'हायब्रीड मॉडेल' असे म्हटले गेले.

अशा पध्दतीने विदयापीठांच्या पारंपारिक चौकटीतून उच्च शिक्षणाचे क्षेत्र बाहेर काढून जागतिकिकरणाच्या आव्हानांना सामोरे जाणारे आणि प्रचलीत बाजारव्यवस्थेला पुरक ठरेल या उद्देशाने सदर योजना आखण्यात आली असली तरी वरिल प्रारुपांमध्ये अनेक त्रुटी दिसून येतात.

१) उच्च शिक्षणाची जबाबदारी खाजगी क्षेत्राकडे ढकलण्यात येऊन खाजगीकरणाला चालना दिलेली आहे.

२) शिक्षण शुल्कात दर तीन वर्षांनी १० टक्के वाढ करण्याची परवानगी देण्यात आली आहे.

ही वाढ खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकदारांच्या हितरक्षणासाठी आहे. यात शंका नाही

३) वरिल तीनही प्रारुपे सरकारला उच्च शिक्षण देण्याच्या स्वतःच्या जबाबदारीतून मोकळे करतात. त्याचबरोबर हे नफा प्राप्तीचे मार्ग आहेत. हे त्यातून स्पष्ट होते.

४) खाजगी क्षेत्रे शहरी व ग्रामीण भागातील शैक्षणिक दरी दुर करण्यासाठी खरोखर प्रयत्न करतील का, हा महत्वाचा प्रश्न आहे.

५) देशातील महिला विद्यापीठांच्या प्रश्नांना सदर अभियानात स्थान काय याचे स्पष्टीकरण नाही.

६) या अभियानामुळे उच्च शिक्षण क्षेत्रात बदल होऊन जागतिक आर्थिक व तांत्रिक बदलांशी सामंजस्य साधले जाईल व जागतिक दर्जाचे शिक्षण भारतीय विदयार्थ्यांना प्राप्त होऊन सरकारचा आशावाद सार्थकी ठरेल का हा महत्वाचा प्रश्न आहे.

यावरुन असे दिसून येते की सरकारला स्वताला उच्च शिक्षणाच्या जबाबदारीतून मुक्त करुन घेऊन त्यासाठी उदारीकरणाच्या नावाखाली उच्च शिक्षणाचे खाजगीकरण करण्याचे धोरण अवलंबल्याचे दिसून येते. त्यामुळे भविष्यात उच्च शिक्षणाच्या सर्व दोज्या शिक्षण सम्राटांच्या हातात जाऊन धोका निर्माण होऊ शकतो. काही राज्यांनी अशा शिक्षण सम्राटांना स्वस्त जमिनी देऊन टाकल्या आहेत. याचा मोह भविष्यकाळात बहुराष्ट्रीय कंपण्यांना होऊ शकतो. त्या स्वतःची विदयापीठे स्थापन करुन सरकारी मदत पदरी पाडून घेऊन नवीन संपत्तीचे साम्राज्य निर्माण होण्याचा धोका नाकारता येणार नाही.

## संदर्भ सूची

१) University News - vol ४५, No - ४८
२) योजना - २००९, २०१४
३) Recommendations of National Knowledge Commission.
४) National Policy on Education १९९२
५) UGC Report on Higher Education - २००३
६) Approach Paper on १२th Five year Plan.
७) An Artical in ' Daily loksatta' ४th March - २०१४
८) विविध संकेतस्थळे.

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded